# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ९

सभावृत्तांत

दिनांक ०७/१२/२०१८ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१८ ची नियमित मासिक सभा शुक्रवार दिनांक ०७/१२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती वाघमारे अश्विनी विक्रम | सदस्या |
| ३) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ४) | मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ५) | मा. श्री. कलाटे मयूर पांडुरंग | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ७) | मा. श्री. कस्पटे संदिप अरुण | सदस्य |
| ८) | मा. श्री. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ९) | मा.श्री. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे | सदस्य |
| १०) | मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |

---------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव

२) मा. श्री. नखाते संदीप भानुदास

३) मा. श्री. जगताप महेश दत्तात्रय

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे, क्षेत्रिय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता, विद्युत, मा. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, मा. संध्या वाघ, मा. व्ही.एन. देसले, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. डी.डी. पाटील, उपअभियंता, बीआरटीएस, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. सुनिल नरोटे, उपअभियंता, स्था. उद्यान, मा. एस.बी.

पाटील, मा. एस.एन. अहिरे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. सुनिल भागवानी, उपअभियंता, नगररचना, मा. लागू ए.ए. प्र. लेखाधिकारी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. एस.एच. खोत, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. सी.एम. कुंभार, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. कावळे एम.डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा.अमित दिक्षित, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. बी.एल. मुलाणी, जयवंत रोकडे, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. प्रविण धुमाळ, शरद मोरमारे, ए.ए. दिक्षीत, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, मा. सोनवणे अतुल, मा. मोरे शशिकांत, एम., मा.कोतवडेकर संदीप, मा. गेंगजे व्ही.एस., क्रीडा निरीक्षक, मा. बी.डी. तरवडे, अतिक्रमण निरीक्षक, मा. जे.व्ही. पटेल, सहा. उद्यान अधिक्षक, मा. दुदुसकर एस.एस., खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे डिसेंबर २०१८ ची दिनांक दि.७/१२/२०१८ रोजीची नियमित मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे डिसेंबर २०१८ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले व विषयपत्रिकेवरील खालील विषयांवर मान्यता देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. २६

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे अनुमोदक : मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे यांचेकडील दिनांक १६/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याबद्दल व त्यांच्या बलिदानाबद्दल देशातीलच नव्हे तर प्रत्येक राज्यातील व्यक्तीला माहिती असुन या बलिदानाचे स्मरण –हावे म्हणुन प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथील औंध रावेत बीआरटीएस या मार्गावर जगताप डेअरी चौक येथे नव्याने विकसित होत असलेल्या उड्डाण पुलाला नागरीकांच्या मागणीनुसार "छत्रपती संभाजी महाराज" उड्डाण पूल असे नाव देणेबाबतचे प्रस्तावावर चर्चा झाली. सदर प्रस्तावास सन्मा. सदस्य श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे यांनी उपसूचना मांडली की पिंपळे सौदागर येथील औंध रावेत बीआरटीएस या मार्गावर जगताप डेअरी चौकातील उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटर व संपूर्ण चौकाला "छत्रपती संभाजी महाराज चौक" नामकरण करणेचे प्रस्तावास उपसूचनेसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

विषय क्र. २ ठराव क्र. २७

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा. तुषार गजानन कामठे अनुमोदक : मा.

संदर्भ : मा. तुषार गजानन कामठे यांचेकडील दिनांक १६/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ मधील कस्पटे वस्ती स्मशानभूमीकडून बाणेरकडे जाणा-या उड्डाणपूलाचे काम चालू आहे. सदर उड्डाणपूल झाल्यास वाकड, पिंपळे सौदागर, जगताप डेअरी चौकातील वाहतुक कोंडी मोठया प्रमाणात कमी होईल. तरी या उड्डाणपूलास "मा. पंतप्रधान अटलविहारी बाजपेयी" यांचे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. ३ ठराव क्र. २८

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा. मयुर पांडुरंग कलाटे अनुमोदक : मा. मा. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे

संदर्भ : मा. मयुर पांडुरंग कलाटे यांचेकडील दिनांक २२/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २५ वाकड चौधरी पार्क येथील हॉरिझोन सोसायटी व स्काय लाईन सोसायटी शेजारील रस्ता हा तिन्ही बाजूने एकत्र आलेला आहे. या ठिकाणाला लँडमार्क नाही तसेच येथील नागरीकांना पत्ता सांगण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. येथील नागरीकांनी लेखी स्वरुपात मागणी केली असुन या चौकाचे नामकरण "छत्रपती संभाजी राजे चौक" असे करण्याबाबतचे प्रस्तावावर चर्चा झाली. मा. सभापती यांनी सदर प्रकरणी मा. आयुक्त सो. यांचेकडे श्रीमती पुजा मारुती कलाटे यांनी दिलेल्या पत्राकडे सभागृहाचे लक्ष वेधले. सन्मा. सदस्य श्री. मयुर पांडुरंग कलाटे यांनी सदर विषयी सभागृहाने लेखी स्वरुपात विरोध नोंदवावा अशी सूचना मांडली. सन्मा. सदस्या श्रीमती वाघमारे यांनी सदर विषय सद्यस्थितीत स्थगित ठेवण्यात यावा अशी सूचना केली. सबब सदर विषय सद्यस्थितीत तहकुब ठेवण्यात यावा अशा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

विषय क्र. ४ ठराव क्र. २९

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. राहुल तानाजी कलाटे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दिनांक २२/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड -पिंपळे निलख मौजे वाकड, सर्व्हे नं. १७८/१ दत्तमंदिर रोडवरुन वेणूनगरकडे जात असताना उजवी बाजूकडे वळण घेण्याआधी जी कॉलनी आहे त्यास १) "सम्राट कॉलनी १" व २) "सम्राट कॉलनी २" हे नाव तेथील रहिवाशांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ५ ठराव क्र. ३०

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. राहुल तानाजी कलाटे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दिनांक २२/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड -पिंपळे निलख मौजे वाकड, सर्व्हे नं. १७८/१ दत्तमंदिर रोडवरुन वेणूनगरकडे जात असताना उजवीकडील बाजूस जो चौक आहे त्यास "सम्राट चौक" हे नाव तेथील रहिवाशांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ६ ठराव क्र. ३१

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. राहुल तानाजी कलाटे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दिनांक २२/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड -पिंपळे निलख मौजे वाकड, सर्व्हे नं.२३९/४ म्हातोबा चौकाकडून उत्कर्ष चौकाकडे जात असताना डावी बाजूस ज्या ३ कॉलनी लागतात त्यास १) " शेख वस्ती लेन क्र. १", २) "शेख वस्ती लेन क्र. २", ३) "शेख वस्ती लेन क्र. ३" हे नाव तेथील रहिवाशांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ७ ठराव क्र. ३२

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. राहुल तानाजी कलाटे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दिनांक २२/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड -पिंपळे निलख मौजे वाकड, सर्व्हे नं.२२८/१/२ कसप्टे वस्ती रोड, छत्रपती चौकाकडून काळेवाडी फाटाकडे जाताना उजव्या बाजूस जी कॉलनी आहे त्या कॉलनीस “चिलेकर नगर लेन नं. १ प्लॉट नं. १ ते १६” हे नाव तेथील रहिवाशांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. ८ ठराव क्र. ३३

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. राहुल तानाजी कलाटे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दिनांक २२/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड -पिंपळे निलख मौजे वाकड, सर्व्हे नं.२३१, कसप्टे वस्ती कै. मारुती गेनू कस्पटे मनपा शाळा क्र. ५९ च्या उजव्या बाजूला जी कॉलनी आहे त्यास “पंढरी निवास रोड” असे नाव तेथील स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

मा. सभापती : माहे डिसेंबर २०१८ चे सभेस सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख उपस्थित राहिले नाहीत. ही बाब सर्वच सदस्यांचा अवमान करणारी आहे . त्यामुळे या पुढील प्रभाग समिती सभेस विभागप्रमुख/शाखाप्रमुख उपस्थित न राहिल्यास पुढची सभा होणार नाही. तरी पुढील सभेस सर्व संबंधित अधिका-यांना सभेस उपस्थित राहणेबाबत क्षेत्रिय अधिकारी यांनी लेखी कळवावे. आजच्या सभेस अनुपस्थित असलेल्या अधिका-यांना लेखी विचारणा करणेत यावी अशा सूचना देणेत आल्या. तसेच सभेस उपस्थित सदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन सभा संपली असे जाहीर करतो.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती,**
ड प्रभाग समिती,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-
(सीताराम बहुरे)
**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/१६८ /२०१८
दिनांक – २७/१२/२०१८